टाइम्स

गुरुवार, दि. ३० जुलै २०१५

# हळबे महाविद्यालयातर्फे डॉ.कलाम यांना भावपूर्ण श्रध्दांजली

दोडामार्ग, २९जुले(वार्ताहर)- भारताची माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे सोमवार २७ जुलै रोजी रात्रौ ७.४५ वाजता शिलाँग येथे दुःखद निधन झाले. ते ८४ वर्षाचे होते. अतिशय साधी राहणी व उच्च विचारसरणी असलेले कलाम मिसाईलमॅन म्हणून परिचित होते.आपल्या कृतीतून त्यांनी प्रखर देशभक्ती प्रकट केली.राष्ट्रपती पदाची मुदत संपल्यानंतरही ते देशभर फिरून युवकांना मार्गदर्शन करत राहीले.भारतातील युवकच देश घडवू शकतील व भारत २०२०मध्ये जागतिक सत्ता बनेल असा प्रचंड आशावाद त्यांनी व्यक्त केला होता.त्यांचे कार्य हे देशाच्या अनेक पिढ्यांना प्रेरणादायी ठरेल असेच आहे.तामिळनाडूतील अतिशय गरीब अशा एका नावाड्याचा मुलगा जिद्द आणि मेहनतीच्या बळावर थोर शास्त्रज्ञ झाला व पुढे राष्ट्रपतीही झाला.अशा या महामानवाचे हृदयविकारामुळे निधन झाल्याने देश एका कुशल मार्गदर्शकाला मुकला आहे. हळबे महाविद्यालयातर्फे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील,प्राध्यापक,प्राध्यापकेतर कर्मचारी व विदयार्थ्यांनी दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली वाहीली आणि त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी यासाठी प्रार्थना करण्यात आली.